नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | अंक - १४९ | वार मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 2nd | Issue - 149 | Blow- Tuesday Date 15 October 2024 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ईडीची कारवाई, ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीच्या कार्यालयांवर छापे, १ हजार कोटी रुपये गोठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कर्जत – जामखेड मतदारसंघातील हजारो गुंतवणूकदारांनी कष्टाचे पैसे ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीमध्ये गुंतवले होते, परंतु संस्थेने ही रक्कम परत न करता गुंतवणूकदारांची फसवणूक केली. त्यामुळे अनेक गुंतवणूकदार आर्थिक संकटात सापडले. या प्रकरणी ईडीने तातडीने कारवाई करत ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीच्या कार्यालयांवर छापे टाकले आणि १ हजार कोटी रुपये गोठवले. ही कारवाई राज्यभरातील लाखो गुंतवणूकदारांसाठी मोठा दिलासा ठरली आहे.

फसवणुकीचा हा प्रकार उघड झाल्यानंतर गुंतवणूकदारांनी फसवणुकीची तक्रार केली. या संपूर्ण प्रकरणात तातडीने लक्ष घालत आमदार रोहित पवार यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन या प्रकरणी तातडीने योग्य ती पावले टाकून कर्जत जामखेड मतदारसंघासह राज्यभरातील सामान्य गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. आमदार पवार यांनी या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर त्यांच्या मागणीची यंत्रणेने



दखल घेतली आणि ईडीने तातडीने कारवाई करत ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीच्या कार्यालयांवर छापे टाकले आणि १ हजार कोटी रुपये गोठवले. ही कारवाई राज्यभरातील लाखो गुंतवणूकदारांसाठी मोठा दिलासा ठरली आहे.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदारसंघात गुंतवणूकदारांसोबत आंदोलन सुरू केले होते आणि हे प्रकरण तालुका स्तरावर न ठेवता पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावे अशी मागणी केली होती आणि आता याबाबत आर्थिक गुन्हे शाखेकडेही पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भात या सर्व बँकांवर ज्या बँकेचे नियंत्रण असते त्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे देखील आमदार रोहित पवार यांनी रीतसर तक्रार केली असून त्याचा पाठपुरावा सुरू आहे.

ईडीच्या या कारवाईमुळे गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला असला तरी अजूनही त्यांना त्यांच्या हक्काच्या पैशाची प्रतीक्षा आहे. सरकारने आता तातडीने यासाठी ठोस योजना आखावी आणि गुंतवणूकदारांचा विश्वास परत मिळवावा, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. या प्रकरणात आमदार रोहित पवार यांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता मोलाची ठरली असून भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कडक धोरणांची आवश्यकता असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही नाक्यांवर टोलमाफी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनीधी : विधानसभेची आचारसंहिता कोणत्याही क्षणाला लागू शकते. निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन राज्याच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा करण्याची शक्यता आहे.

मंत्रालयात हालचाली गतीमान झाल्या असून महायुती सरकारची ही शेवटची मंत्रिमंडळाची बैठक ठरण्याची शक्यता आहे.

या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची राज्य मंत्रिमंडळात मोठी घोषणा केली आहे. मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्यात आला आहे. रात्री बारा वाजल्यापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

कोणत्या पाच टोलनाक्यावर टोलमाफी?

आनंदनगर टोलनाका, दहिसर टोलनाका, मॉडेला टोलनाका, वाशी टोलनाका, ऐरोली टोलनाका

टोलमाफीवर राज ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया : गेली अनेक वर्ष आमचा हा लढा सुरु होता त्याला यश मिळालं आहे, उशिरा का होईना सरकारला सुबुद्धी मिळाली. हा निर्णय निवडणुकीपुरता न ठेवता कायम असावा नाहीतर निवडणुकीनंतर त्याचा बोजा जनतेवर माराल.मंत्रिमंडळ बैठकीच्या संदर्भात मोठी गोपनीयता महायुती सरकारची ही शेवटची मंत्रिमंडळाची बैठक ठरण्याची शक्यता आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले जाणार आहे.मंत्रिमंडळ बैठकीच्या संदर्भात मोठी गोपनीयता ठेवण्यात आली आहे.

मंत्रीमंडळ बैठकीचा अजेंडा मंत्र्यांना थेट बैठकीत दिला जाणार

### आचारसंहितेपूर्वी राज्य सरकारचा मोठा निर्णय

आहे. बैठकीच्या आधी कोणत्याही मंत्र्यांना किंवा अधिका-यांना अजेंडा दिला गेला नाही . त्यामुळे आयत्यावेळी अनेक निर्णय होणार आहे. राज्यात लवकरच विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे.कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू शकतो. त्याआधी राज्य सरकार महत्त्वाचे निर्णय घेत आहे. याआधी महायुती सरकारने समाजातील वेगवेगळ्या घटकांना आकर्षित करण्यासाठी महायुती सरकारने अनेक लोकप्रिय निर्णय घेतले आहेत. सरकारने राज्यातील होमगार्ड्सचे मानधन जवळपास दुप्पटे केले आहे. या निर्णयाचा जवळपास ५० हजार होमगार्ड्सना फायदा होणार आहे.

यासह सरकारने राज्यातील अनेक आय.टी.आय. संस्थांची नावे बदलली आहेत. या संस्थांना महापुरुषांची नावे देण्यात आली आहेत. राज्य सरकारने राज्यातील मदरशांत शिकविणाऱ्या शिक्षकांचे मानधनही दुप्पट केले आहे.

## थोडक्यात

### बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील दुसरा आरोपी उत्तर प्रदेशातून अटकेत

पुणे : बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणात पसार असलेल्या आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने उत्तर प्रदेशातील प्रयागराज परिसरातून सोमवारी अटक केली. सामूहिक बलात्कार प्रकरणात आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, तिसऱ्या आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. अख्तर अली शेख (वय २८, रा. कोंढवा, मूळ रा. प्रयागराज, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

### आंघोळीसाठी नहरावर गेलेले ४ विद्यार्थी वाहून गेले

नागपूर : रामटेक तालुक्यातील घोटीटोक बोरी येथील इंदिरा गांधी मुलांच्या वसतिगृहातील चार विद्यार्थी नहरावर आंघोळीला गेले असता वाहून गेल्याची दुर्दैवी घटना सोमवारी घडली. मनदीप अविनाश पाटील (इयत्ता अकरावी), मयूर खुशाल बांगरे (इयत्ता नववी), मयंक कुणाल मेश्राम (इयत्ता आठवी), अनंत योगेश सांबारे (इयत्ता सातवी), अशी वाहून गेलेल्या मुलांची नावे आहेत. ही सर्व मुले नागपूरची आहेत. या अत्यंत दुर्दैवी घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच लोकांनी घटनास्थळ आणि शाळेच्या आवारात गर्दी केली. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

## दिल्ली सरकारचा मोठा निर्णय; फटाके फोडण्यासह विक्रीवरही बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : दिल्लीत प्रदूषणाच्या पातळीत सातत्याने वाढ होत असल्याच्या बातम्या अनेकदा समोर येतात. आता या पार्श्वभूमीवर दिल्ली सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. दिल्लीत प्रदूषणाच्या पातळीत वाढ झाल्यानंतर अनेक नागरिकांना श्वसनाचा त्रासाला सामोरं जावं लागतं. त्यामुळे दिल्ली सरकारने आता महत्वाचा निर्णय घेत १ जानेवारी २०२५ पर्यंत फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या उत्पादनासह विक्रीवर बंदी असणार आहे.

दसरा उत्सवानंतर राजधानीतील हवेची गुणवत्ता मध्यम श्रेणीवरून खाली घसरली होती. त्यामुळे दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीच्या आदेशाने १ जानेवारी २०२५ पर्यंत दिल्लीच्या प्रदेशात सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या उत्पादनासह स्टोरेज, विक्री, ऑनलाइन प्लेटफॉर्मद्वारे वितरण आणि सर्व प्रकारचे फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच पोलीस आयुक्तांनाही यासंदर्भातील सूचना देत फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्यासाठी निर्देशांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

दरम्यान, मंत्री गोपाल राय यांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी एक्सवर (ट्विटर) म्हटलं आहे की, हिवाळ्यात वाढते प्रदूषण लक्षात घेता आजपासून १ जानेवारीपर्यंत फटाक्यांचे उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वापरावर बंदी घालण्यात आली आहे. दिल्ली सरकारने बंदीच्या सूचना जाही केल्या आहेत. मी सर्व दिल्लीकरांना सहकार्य करण्याचे आवाहन करतो, असं मंत्री गोपाल राय यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, आता काही दिवसांवर दिवाळी आली आहे. मात्र, दिल्लीत यंदाही फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. दिल्लीत वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत फटाक्यांच्या उत्पादनासह विक्री आणि फटाके फोडण्यावरही बंदी घालण्यात आली आहे.

## दर दिवाळीत होणारी एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द, महामंडळाकडून प्रवाशांना दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटी महामंडळाकडून दर वर्षी दिवाळीत १० टक्के भाडेवाढ केली जाते. मात्र, प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान एका महिन्यासाठी महामंडळाने एसटीची भाडेवाढ लागू केली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. महामंडळाने भाडेवाढ रद्द करत एसटीच्या प्रवाशांना दिलासा दिला आहे. राज्यभरातील प्रवाशांना या



निर्णयामुळे फायदा होणार आहे.

दिवाळीत केली जाणारी हंगामी भाडेवाढ रद्द केल्यामुळे एसटी महामंडळाला मिळणारी अतिरिक्त रक्कम यंदा मिळणार नाही. मात्र, या निर्णयाचा प्रवाशांना फायदा होणार आहे. या भाडेवाढीमुळे एसटीचा लांब पल्ल्याचा प्रवास महागणार होता. परंतु, आता एसटीच्या तिकीटाचे दर 'जैसे थे' अवस्थेत राहतील.

मुंबई- पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेप्रमाणेच आदरादिथ्य आणि व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका (शिवनेरी सुंदरी) नेमण्यात येणार आहे. प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येणार आहे. गेल्या आठवड्यात एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी महामंडळाच्या ३०४ व्या बैठकीत ही घोषणा केली.

## अभिनेता अतुल परचुरेचं निधन; पु.लंची शाबासकी मिळवणारा हरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : अभिनेता अतुल परचुरे यांचं निधन झालं आहे. व्यक्ती आणि वल्ली या नाटकात पु. ल. देशपांडे यांची भूमिका अतुलने साकारली आणि पु.ल. देशपांडे यांनी ती पाहिली आणि अतुलला शाबासकी दिली होती. अतुल परचुरेंना कर्करोग झाला होता, त्यातूनही तो बाहेर आला होता, त्याच्या जिद्दीचं कौतुक झालं होतं. आज त्याची प्राणज्योत मालवली आहे. त्याच्या मागे त्याची आई, पत्नी आणि मुलगी असं कुटुंब आहे. नाटक, सिनेमा, चित्रपट या सगळ्या माध्यमांमध्ये त्यांनी काम केलं आहे. अतुलला कर्करोग झाला हे ऐकून अनेकांना धक्का बसला होता. त्याने त्याच्या वेदना विविध मुलाखतींमध्ये सांगितल्या होत्या.

अतुल परचुरे यांनी जिगरबाज वृत्तीनं कॅन्सरवर मात केली होती. त्यानंतर त्यांनी पुन्हा काम करण्यास सुरुवात केली होती. मराठी रंगभूमीवर पुन्हा दाखल झालेल्या सूर्याची पिल्ले या नाटकातही त्यांची भूमिका होती. पण, कॅन्सरनंतरची त्यांची इनिंग दुर्दैवानं फार काळ चालली नाही. त्यांच्या निधनानं चित्रपटसृष्टीत हळहळ व्यक्त होत आहे. अष्टपैलू अभिनेता, चांगला मित्र गमावल्याची भावना त्यांच्या सहकलाकारांनी व्यक्त केली आहे. अभिनेता अतुल परचुरेने काही महिन्यांपूर्वी एका पॉडकास्टला मुलाखत दिली होती. त्यात कर्करोगाशी कसा लढा दिला हे सांगितलं होतं. अतुल म्हणाला होता, सिटी स्कॅन करण्यासाठी डॉक्टरांकडे गेलो तेव्हाही डोक्यात नव्हतं की आपल्याला कॅन्सर वगैरे असेल. सिटी स्कॅन केल्यानंतर मला डॉक्टर म्हणाले उद्या आपण चठउझ करु. मी त्यांना विचारलं डॉक्टर सांगा ना काय झालं आहे? तर डॉक्टर म्हणाले उद्या कळेलच आपल्याला सगळं. ती टेस्ट केली, त्यानंतर मला समोर बसवलं. ते मला म्हणाले की आता वारंवार काही शब्द ऐकायची तयारी ठेवा. डॉक्टर मला म्हणाले की तुमच्या लिव्हरमध्ये आम्हाला एके ठिकाणी ट्युमर दिसतो आहे. तो ट्युमर साधारण पाच सेमीचा आहे. तुम्ही काळजी घ्या. मी तेव्हा त्यांना विचारलं की मॅलिग्नंट आहे का? म्हटलं म्हणजे कॅन्सर झाला आहे का? तर ते म्हणाल हो. मी त्यांना विचारलं की मी यातून बाहेर पडू शकतो का? तर डॉक्टर मला म्हणाले की मी तू बाहेर पडशील पण माझ्यापेक्षा तुला कॅन्सर स्पेशालिस्ट हे जास्त चांगल्या पद्धतीने चांगलं सांगतील. त्यानंतर मी ते रिपोर्ट घेऊन घरी आलो. सोनियाला मी सांगितलं होतं की ट्युमर वगैरे आहे. पुढे अतुल म्हणाला होता, घरी आल्यानंतर मी सर्वात आधी आईला सांगितलं. डॉक्टरांनी मला सांगितलं आहे की कॅन्सर आहे. तर आई म्हणाली हो? मग डॉक्टर काय म्हणाले? मी आईला सांगितलं की डॉक्टर म्हणत आहेत की दोन-तीन प्रोसिजर्स आहेत ते झालं की तुमच्या लिव्हरची साईझ वाढेल मग आपण ते काढून टाकू. काढून टाकू म्हणालेत ना डॉक्टर मग लक्षात ठेव तुला काहीच होणार नाही काळजी करु नकोस मला आईने सांगितलं. सोनियाला कॅन्सर झाल्याचं सांगितलं तेव्हा ती पण हेच म्हणाली की तुला काहीच होणार नाही. त्या क्षणी मला एक गोष्ट जाणवली की तुमची कशावर तरी श्रद्धा हवी. मग ती पुस्तकावर असो, देवावर असो, स्वामी समर्थांवर असो, येशूवर, अल्लावर कुणावरही असो पण ती हवी आणि १०० टक्के हवी. माझी आई, बायको आणि माझी मुलगी या माझ्या तीन सपोर्ट सिस्टिम आहेत. माझी त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. असं अतुल परचुरे म्हणाले होते. कर्करोगाशी इतका हिंमतीने लढणारा माणूस आज आपल्याला सोडून निघून गेला आहे.

**अतुल परचुरेने त्याच्या अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर रंगभूमी, छोटा पडदा, मालिका विश्व सगळंच गाजवलं. परचुरे यांना कर्करोग झाला होता. कापूस कोंड्याची गोष्ट, नातीगोती, तरुण तुर्क म्हातारे अर्क, व्यक्ती आणि वल्ली या नाटकांमधल्या त्यांच्या भूमिका चर्चेत राहिल्या. द कपिल शर्मा शो या कार्यक्रमातही अतुल परचुरे यांनी बराच काळ काम केलं. अलिबाबा आणि चाळिशीतले चोर हा अतुल परचुरेंचा शेवटचा सिनेमा ठरला.**

### माढा नगरीच्या मातीत रंगला मनोरंजनाचा थरार

### नागरिकांनी कृषी व सांस्कृतिक महोत्सव बघण्यासाठी केली तुडुंब गर्दी

## महाराष्ट्रात जे जे प्रसिद्ध होईल ते माझ्या माढ्यात आणणार : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित 'माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव – २०२४' महोत्सवाच्या सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे हास्यवीरांनी माढा नगरीच्या मातीत कलाकारांच्या हास्य, मनोरंजन आणि अदाकारीनं माढा मतदार संघातील नागरिकांना विशेष आनंद घेतला.

महत्त्वाच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे हास्यवीर सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले व इतर कलाकारांच्या कार्यक्रमांचे सादरीकरण झाले.. आपल्या अस्सल मराठमोळ्या अंदाजात भार्गवी चिरमुले यांनी सादर केलेलं नृत्य.. रसिकांसाठी अद्वितीय ठरलं.. तर हास्य मनोरंजनाच्या कार्यक्रमात हास्यवीर अभिनेते श्री.पृथ्वीक प्रताप आणि अभिनेत्री शिवाली परब या कलाकारांनी प्रेक्षकांना अक्षरशः पोट धरून हसायला लावलं..



यासोबतच या प्रदर्शनात शेतकरी बांधवांना नवनवीन संशोधन, नवनवीन आधुनिक अवजारे, पिकांमधील नवनवीन जाती , शेतीच्या आधुनिक पद्धती याबाबत सखोल व शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले.

या कार्यक्रमात नागरिकांना कृषी विषयक साहित्य पाहायला मिळत आहे. माढा मतदार संघात एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमच अशा पद्धतीचा कार्यक्रम होत असून माढा तालुक्यातील हजारो नागरिक याचा लाभ घेत आहेत त्याचा अभिमान आहे..

## संपादकीय....

# प्रवाशांना दिलासा

एसटी महामंडळाकडून दर वर्षी दिवाळीत १० टक्के भाडेवाढ केली जाते. मात्र, प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान एका महिन्यासाठी महामंडळाने एसटीची भाडेवाढ लागू केली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. महामंडळाने भाडेवाढ रद्द करत एसटीच्या प्रवाशांना दिलासा दिला आहे. राज्यभरातील प्रवाशांना या निर्णयामुळे फायदा होणार आहे. दिवाळीत केली जाणारी हंगामी भाडेवाढ रद्द केल्यामुळे एसटी महामंडळाला मिळणारी अतिरिक्त रक्कम यंदा मिळणार नाही. मात्र, या निर्णयाचा प्रवाशांना फायदा होणार आहे. या भाडेवाढीमुळे एसटीचा लांब पल्ल्याचा प्रवास महागणार होता. परंतु, आता एसटीच्या तिकीटाचे दर 'जैसे थे' अवस्थेत राहतील. मुंबई- पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेप्रमाणेच आदरादिथ्य आणि व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका (शिवनेरी सुंदरी) नेमण्यात येणार आहे. प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येणार आहे. गेल्या आठवड्यात एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी महामंडळाच्या ३०४ व्या बैठकीत ही घोषणा केली. एस. टी. महामंडळाच्या प्रत्येक बस स्थानकांवर त्या परिसरातील महिला बचत गटांना आपले स्थानिक पदार्थ विकण्यासाठी चक्रीय पद्धतीने नाममात्र भाडे आकारुन १०द१० आकाराचा स्टॉल उपलब्ध करून दिला जाणार आहे. उपरोक्त निर्णयाबरोबरच नवीन २५०० साध्या बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू करणे तसेच १०० डिझेल बसेसचे प्रायोगिक तत्त्वावरील इलेक्ट्रिक बसमध्ये रूपांतर करणे अशा विविध विषयांना या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली.

# अकोले शहरात फटाक्यांची आतषबाजी, महायुती सरकारच्या निर्णयाचे पत्रकार संघाकडून उत्साहात अभिनंदन!

## महाराष्ट्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय: पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी : महायुती सरकार ने ऐतिहासिक निर्णय घेत पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना त्यांच्या रोजच्या कामकाजात आर्थिक मदत मिळणार आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांनाही याचा फायदा होणार असून त्यांच्या व्यवसायाला एक नवीन दिशा मिळेल.

पत्रकारांना अधिकृत कर्ज सुविधा, विमा योजनांचा लाभ, तसेच विविध सरकारी योजनांचा आधार मिळवून देण्यासाठी या महामंडळाची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. या महामंडळामुळे पत्रकारांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी आता शासनाकडे मदत मागावी लागणार नाही. पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांना आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांच्या कामात सुसूत्रता आणि स्थैर्य येईल. असा विश्वास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केला.

पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना महायुती सरकारने केल्याचा आनंद पत्रकारांच्या वतीने फटाके फोडून व पेढे भरवून अकोले बसस्थानका समोर साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, हेमंत आवारी, विद्याचंद्र सातपुते, गणेश आवारी, भाऊसाहेब साळवे, संदीप दाताखीले, सचिन खरात, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, तालुका उपाध्यक्ष हरिभाऊ फापाळे, दत्ता जाधव, आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांचे हक्क आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने आयोजित केलेली पत्रकार संवाद यात्रा अखेर यशस्वी ठरली. या यात्रेची सांगता नुकतीच मुंबई येथील मंत्रालयात झाली, ज्यामध्ये पत्रकारांच्या हितासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली, ज्यामुळे या क्षेत्रातील लोकांना आर्थिक स्थैर्य लाभेल.

संवाद यात्रेची पार्श्वभूमी: ही पत्रकार संवाद यात्रा नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी येथून सुरू झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, संपूर्ण महाराष्ट्रभर पत्रकार बांधवांनी ही यात्रा केली. विविध जिल्ह्यांमधून प्रवास करताना, त्यांनी पत्रकारांच्या समस्या आणि मागण्या मांडण्यासाठी सर्व आमदार, खासदार आणि विरोधी पक्ष नेत्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी सुरक्षा, आर्थिक मदत, आणि सामाजिक प्रतिष्ठा यांसारख्या मुद्द्यांवर या यात्रेदरम्यान ठोस चर्चा झाली.

या संवाद यात्रेत, पत्रकार बांधवांनी प्रत्येक जिल्ह्यातील राजकीय नेत्यांना निवेदने सादर केली. त्यांनी पत्रकारांवरील हल्ले, कामाच्या कठीण परिस्थितीतील अडचणी आणि आर्थिक समस्यांबद्दल शासनाला सविस्तर माहिती दिली. यासोबतच, पत्रकार संवाद यात्रेच्या विविध पोस्टर्सचे अनावरण देखील करण्यात आले, ज्यात या मुद्द्यांवर अधिक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नेत्यांची भूमिका आणि स्वागत:

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे यांनी मोठे योगदान दिले. चंद्रकांतदादा पाटील, मंगल प्रभात लोढा आणि पंकजा मुंडे यांसारख्या नेत्यांनी या संवाद यात्रेच्या समारोपाला उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शविला.

पत्रकार संघाच्या या महत्वपूर्ण यशस्वी संवाद यात्रेमुळे राज्यातील पत्रकार वर्गात आनंदाची लहर पसरली आहे. महायुती सरकारच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. हा निर्णय पत्रकारांच्या हक्कांसाठी उभे राहण्यासाठी एक नवीन आदर्श निर्माण करणारा ठरला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सर्व आमदार, खासदार, सर्वपक्षीय नेते, विरोधी पक्ष नेते तसेच सरकारमधील सर्व नेते आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे. महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे पत्रकार वर्गात उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी संवाद आणि समन्वयाच्या दृष्टीने हे पाऊल स्वागतार्ह आहे, ज्यामुळे पत्रकारिता क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेने पत्रकारांचे हक्क आणि समस्या सोडवण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आता अधिक सुरक्षित आणि आर्थिक स्थिर जीवन मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पत्रकार संघाच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील पत्रकारिता क्षेत्राच्या भविष्याला नवीन दिशा मिळाली आहे, ज्यामुळे पत्रकारांच्या हक्कांच्या लढ्यात हा एक मोठा विजय मानला जात आहे.

# येळी येथील आपत्तीग्रस्त शेतकऱ्याचे शिवसेनेकडून मदत व सांत्वन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : दि.१० ऑक्टोबर च्या मध्यरात्री शॉर्टसर्किटने मौजे. येळी ता.उमरगा येथील श्री.लक्ष्मण बसलिंग धनुरे यांचे गोठ्यातील जनावरांसह सोयाबीन जळून पूर्णतः खाक झाले असुन त्यामध्ये अत्यंत दुःखद घटना म्हणजे त्यांचे ०२ बैल, ०१ म्हैस दगावली व गाय ६०% इतकी भाजली आहे. त्यासोबतच गेल्या व या वर्षाचे सोयाबीन, मोटरसायकल, शेती अवजारे पूर्णतः जळून गेली आहेत. या घटनेची माहिती मिळताच आमदार ज्ञानराज चौगुले यांनी युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड यांच्या समवेत घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी उपस्थित उमरगा तहसीलदार गोविंद येरमे यांना घटनेचे तात्काळ पंचनामे करून सदर शेतकऱ्यास नुकसान भरपाई मिळवून देण्याच्या सूचना केल्या. तसेच यावेळी शिवसेनेकडून आर्थिक मदत व सांत्वन करण्यात आले.

यावेळी तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, उपतालुकाप्रमुख व्यंकट पाटील, शेखर पाटील, सरपंच पतंग पवार, उपसरपंच रामलिंग बिराजदार, व्यंकट माशाळकर, तलाठी दूधभाते आदी जण उपस्थित होते.

# रोहडा येथील तपोवनदेवी मंदिर परिसरातील तलावात मृतदेह आढळल्याने खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : चिखली तालुक्यातील रोहडा इथून जवळच असलेल्या तपोवन देवी मंदिरा परिसरातील पाझर तलावामध्ये अनोळखी इसमाचे प्रेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली,बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्रातून अनेक भाविक भक्त तपोवन देवीच्या दर्शनासाठी येत असतात.अशातच नवरात्रीच्या दिवसांमध्ये देवी मंदिर परिसरातील पाझर तलावामध्ये एका अनोळखी इसमाचे प्रेत तरंगताना अनेक नागरिकांना दिसून आले,रोहडा येथील पोलीस पाटील यांनी या घटनेची माहिती अंढेरा पोलीस स्टेशनला कळविला असता घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांनी तलावाच्या पाण्याच्या बाहेर मृतदेह काढल्यानंतर मृतक पुरुष असून त्याची उंची ५ फुट ६ इंच,मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४२ ते ४५ वर्ष वर्ण सावळा असुन मृतदेहाच्या अंगामध्ये पांढऱ्या रंगाचा ठिपक्याचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट,विटकरी कलरची बनियान असून पोलिसांनी या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी परिसरामध्ये विचारपूस केले असता कोणालाही सुद्धा या मृत व्यक्ती बाबत माहिती नसल्याची बाब समोर आल्यामुळे मृत व्यक्ती कोण आहे तलावात कसा गेला याचा शोध पोलीस घेत असून या प्रकरणी पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.सदर मयत अनोळखी व्यक्तीची नागरिकांना काही एक माहिती असल्यास याबाबत अंढेरा पोलीस स्टेशनला संपर्क करण्याची विनंती करण्यात आली असून यावेळी अंढेरा पोलिसा कडून अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील मोबाईल नंबर ९४०४८०३३३६ तसेच तपास अधिकारी दुय्यम ठाणेदार सुरेश जारवाल मोबाईल नंबर ९८२३५४३६२३ या संपर्क क्रमांकशी संपर्क करण्याची विनंती करण्यात आली या घटनेचा पुढील तपास अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम ठाणेदार सुरेश जारवाल करीत आहे.

**मृत व्यक्तीची ओळख पटवण्याची अंढेरा पोलिसांकडून नागरिकांना आवाहन**

# अज्ञात व्यक्तींनी पेटविले सोयाबीनची बनिम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे अगोदरच शेतकरी संकटात आले आहेत. भरीस भर म्हणून आता साडे तीन एकरवरील सोयाबीनची काढणी करून ठेवलेले सोयाबीन अज्ञात लोकांनी पेटवून दिल्याची घटना घडली आहे.

उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील शेतकरी भगवान लिंबाजी भुजबळ यांनी शेतातील साडे तीन एक्करवरील सोयाबीनची काढणी करून सोयाबीन बनीम शेतात रचून ठेवली होती. गुरुवारी(ता. १०) रात्री अज्ञात लोकांनी सोयाबीन पेटवून दिले आहे. यामध्ये सदर शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

शुक्रवारी सकाळी ६ वाजता ते आणि त्यांच्या घरातील सदस्य शेतातमध्ये राहीलेली सोयाबीन काढणी करण्यासाठी गेले असता, झाकुन ठेवलेल्या सोयाबीनच्या बनमिला आग लागलेली दिसली. त्यात बनिम जळून राख झाली होती. अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणाने सोयाबीनच्या गंजीला आग लावून सोयाबीनचे दीड लाखाचे नुकसान झाल्याची भुजबळ यांनी सांगितले . या प्रकरणी येणेगूर सज्जाचे तलाठी रंजना राठोड यांनी पंचनामा केला. याबाबत योग्य ती कारवाई करून मदत मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**धर्मांतर घोषणेच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# चळवळीच्या उत्थानासाठी उत्पन्नाचा विसावा हिस्सा म्हणजे ५ टक्के आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स (एएसटी) प्रदान केला पाहिजे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : शहरातील नवयुग कॅलनी भावसिंगपुरा येथील नवयान बुद्ध विहारात १३ ऑक्टोबर २०२४ ला सायंकाळी धर्मांतर घोषणेच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात बोलताना प्रमुख वक्ते बी. बी. मेश्राम म्हणाले की, जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाही याचे भान ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासात मार्गदर्शन करताना ऑक्टोबर महिन्यात २६ वेगवेगळ्या विषयांवर संदेश दिले आहेत. त्या सर्व संदेशाचे मर्म समजून घेताना वर्तमानातील प्रासंगिकता तपासून पाहिली पाहिजे. जेणेकरून पुढील दिशा निश्चित करून मार्गक्रमण करता येईल. ४ आक्टोबर १९४५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपल्या प्रगतीसाठी देशाला मिळणा-या सत्तेमध्ये आपण भागीदार झालेच पाहिजे. या विधानाची महती लक्षात घेता जीवनाच्या सर्व क्षेत्रातील आपली भागीदारी किती आहे? हे तपासून मूल्यांकन केले पाहिजे. ऊर्वरीत भागीदारी मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच ४ ऑक्टोबर १९४७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, समाजाचे विश्वासू नेते बनून योग्य मार्गदर्शन करावे. या अनुषंगाने विचार करता समाजात मार्गदर्शन करणारे विश्वासू नेते निर्माण झाले आहेत काय? याची विदारक स्थिती पहाता समाजात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी आम्हाला या देशाची शासनकर्ती जमात व्हायचे आहे? हे स्वप्न दुरापास्त ठरत आहे. याची उणीव भरून काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ च्या काळात ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रट्स टू पॉलिटिक्स ची स्थापना केली होती. ते फार काळ चालले नाही.

आता मात्र समग्र आंदोलन चालविण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता असल्याने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याचे कार्य आपण प्रत्यक्षात सुरू केले आहे. यात सहभागी होऊन आपण या आंदोलनाचा कारवाँ वेगाने गतिमान करण्यासाठी सहकार्य करावे.

१३ ऑक्टोबर १९३५ ला नाशिक जिल्ह्यातील येवले मुक्कामी झालेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही. असा निर्वाणीचा इशारा दिला होता. ज्याचे उत्स्फूर्त परिणाम समाजात उमटले. त्यानंतर तत्कालीन परिस्थितीत देशात अस्तित्वात असलेल्या जात-पात-तोडक मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लाहोर येथे संपन्न होणाऱ्या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी पाचारण केले होते. मात्र आयोजकांत मतभेद झाल्यामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले भाषण लिखित स्वरूपात उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. जेणेकरून जनतेला माहीतीस्तव प्रकाशित करून उपलब्ध करून दिले जाणार होते. ही विनंती मान्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्प्रयासाने प्रस्तावित भाषण उपलब्ध करून दिले. ज्यावर पूर्वग्रहदूषित आयोजकांत तीव्र मतभेद होऊन त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना भाषणात सुधारणा करण्याचे सुचविले होते. ज्याला उत्तर देताना यात काना तर काय वेलांटी सुद्धा बदलता येणार नाही. असे डॉ. आंबेडकरांनी आयोजकांना कणखरपणे सुनावले होते. ज्यामुळे ती प्रस्तावित परिषद पुढे ढकलण्यात आली आणि ती कधी घडूनच आली नाही. म्हणून ते प्रस्तावित भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचे निर्मुलन या सदराखाली पुस्तक रूपाने प्रकाशित केले. हा इतिहास लक्षात घेता आपण तशी कणखर भूमिका घेत आहोत काय? याचे विश्लेषण करून मार्गक्रमण केले पाहिजे.

**समग्र आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला निर्वाणीचा इशारा अंमलात आणताना धमंतराचे वेळी आपल्या उत्पन्नाचा २० वा हिस्सा म्हणजे ५ टक्के प्रदान करण्याची अपील केली होती. आपण आपल्या वेळ, बुद्धी (कौशल्य), पैसा (अर्थ) इत्यादींचे समाजऋण परतफेड म्हणून खर्च करीत आहोत काय? या अनुत्तरित प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून जसे सर्व व्यवहारात जीएसटी अर्थात गुडस एंड सर्व्हिस टॅक्स भरत असू तर मग आंबेडकराईट आंदोलनाच्या उत्थानासाठी ५ टक्के एएसटी अर्थात आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स अदा करण्याची भूमिका पार पाडली पाहिजे.**

अशाप्रकारे प्रमुख वक्ते बी. बी. मेश्राम यांनी विविध मुद्यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची अध्यक्षता कॅप्टन रमेश खरात यांनी केली. सुत्रसंचालन व आभार के. सी. गजभिये यांनी व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते आदर्शांना हार, पुष्प अर्पण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाला एड. आर. टी. खंदारे, मधुकर ठोंबरे, रमेश खरात, बी. एस. भालेराव, पंकज गजभिये, दिलीप मेश्राम, रविंद्र दाभाडे, ई. टी. खोब्रागडे, प्रदीप पाटील, प्रल्हाद मोरे, के. आर. तिनगोटे, एस. एस. दहाट, एस. घोबले, के. जी. गणवीर, अल्का गणवीर, शुभदा कांबळे, पंचशीला कांबळे इत्यादी हितचिंतक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### अपहृत मुलीची माहिती मिळाल्यास संपर्क करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : सोलापूर तालुका पोलीस ठाणे, ग्रामीण गुरूनानक चौक यांच्या माहिती नुसार दि. २८ एप्रिल २०२४ रोजी अल्पवयीन मुलीगी कु. वैष्णवी विकास शिंदे वय १७ वर्षे ९ महिने, राहणार संभाजी नगर , हगलूर ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथून दूपारी ०१. ०० वा.आसपास या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले असून. अपहृत मुलीचे वर्णन -बांधा सडपातळ, रंग गोरा, उंची ६ फूट, शिक्षण १२ वी पास, भाषा मराठी, केस लांब -काळे असून, अंगात काळी पँट व जांभळ्या रंगाचा टॉप आहे. या बाबत श्री विकास नागनाथ शिंदे, वय ३८ राहणार संभाजी नगर , हगलूर ता. उत्तर सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे. या अपहृत मुलीचा शोध होणे कामी काहि माहिती मिळाल्यास महिला पोलीस उपनिरीक्षक सोलापूर ता. पोलीस (ग्रामीण) गुरूनानक चौक (फोन-०२१७-२७३२०१७) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन महिला पोलीस उपनिरिक्षक एन.एस.गंपले यांनी केले आहे.

### सैनिकी मुलींचे वसतिगृह येथे पहारेकरी या पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलींचे वसतिगृह, सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर पहारेकरी- ०१ पद भरावयाचे आहे. पहारेकरी पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. मानधन रूपये २०८८६/- प्रतिमहा असेल. तसेच सदरील पद हे निवासी आहे. पहारेकरी पद हे माजी सैनिक प्रवर्गातून भरावयाची असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात सादर करावे व या पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील. तरी उमेदवारांनी स्वत:ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पद निवडीसाठी माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्हयातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# सर्व शासकीय यंत्रणांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी

## राज्यपाल यांचा आज सोलापूर जिल्हा दौरा; जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनीधी) : महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन हे १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

जिल्ह्यातील सर्व उद्योजक, व्यावसायिक, पत्रकार, प्रतिष्ठित व्यक्ती, आजी-माजी खासदार व आमदार, जिल्ह्यातील सर्व अधिकारी, राजकीय नेते, राजकीय पक्ष, जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी यांच्याशी शासकीय विश्राम गृह सोलापूर येथे ते संवाद साधणार आहेत. हा दौरा यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित माननीय राज्यपाल दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस उपयुक्त दिपाली काळे, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, यांत्रिकी विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.




जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी दोन या कालावधीत सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, अन्न औषध विभाग, पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, महापालिका, जिल्हा परिषद, माहिती विभाग या सर्व विभागांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी.

सर्व संबंधित नोडल अधिकारी व कॅम्प अधिकारी यांनी परस्परात समन्वय ठेवून दौरा यशस्वी करावा. नियोजनात कुठेही हलगर्जीपणा करू नये, असे निर्देश त्यांनी दिले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नियुक्ती केलेले नोडल अधिकारी व कॅम्प अधिकारी यांच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीचे वाचन केले व सदरची जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडावी असे त्यांनी सांगितले.

तसेच माननीय राज्यपाल दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे येतील त्यानंतर सकाळी ११:१५ ते १२:५० या कालावधीत जिल्ह्यातील अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, राजकीय पक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, लॉयर्स असोसिएशन, चार्टर्ड अकाउंटंट, जिल्ह्यातील उद्योजक, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर व्यक्ती, एनजीओ, पत्रकार व अन्य यांच्याशी चर्चा करणार आहेत. त्यानंतर दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी ते सोलापूर हुन पुढील कार्यक्रमासाठी जाणार आहेत. तरी या कालावधीत सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत दक्ष रहावे, असेही श्रीमती कुंभार यांनी सुचित केले.

# मराठा तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक बनावे : अर्जुन चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोलापूर जिल्ह्यात गाव तेथे शाखा आणि घर तेथे कार्यकर्ता तयार करत असतानाच अण्णासाहेब पाटील महामंडळाचा लाभ मराठा बांधवांना तरुणांना झाला पाहिजे. यासाठी कार्य सुरू असून आज पांढरेवाडी येथे शाखा उद्घाटन करताना मनस्वी आनंद होत आहे. मराठा तरुणांनी आणि बांधवांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा उद्योग निर्माण करावा यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाचा लाभ घेऊन नोकरी देणारे तयार व्हावेत अशी प्रतिक्रिया सोलापूर जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांनी पांढरेवाडी येथील शाखा उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केली.

**गाव तेथे शाखा घर तेथे कार्यकर्ता आणि महामंडळ पोहोचवणार**

प्रारंभी मराठा महासंघाच्या फलकाचे उद्घाटन अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. युवक जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली पांढरेवाडी येथे अखिल भारतीय युवक मराठा महासंघ या शाखेची उभारणी करण्यात आली.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण पुढे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यासाठी आता नरेंद्र पाटील यांनी पंढरपुरातच अण्णासाहेब पाटील महामंडळाचे कार्यालय सुरू केल्याने पंढरपूर तालुक्यासह माळशिरस नातेपुते अकलूज सांगोला मंगळवेढा मोहोळ अधिभागातील मराठा समाज बांधवांना याचा लाभ होणार आहे. या महामंडळामध्ये एक लाखापासून पन्नास लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध असून याचा लाभ समाजातील तरुणांनी बांधवांनी घ्यावा त्याचबरोबर आपण नोकरी न करता आपण उद्योजक बनावे व आपल्याकडे नोकरीसाठी इतरांना संधी द्यावी अशी भूमिका पार पाडण्यासाठी आग्रह केले.



या कार्यक्रमासाठी तालुकाध्यक्ष संतोष जाधव, शहराध्यक्ष अमोल पवार, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष हनुमंत कदम, शहर रिक्षा संघटना अध्यक्ष- नागेश गायकवाड, टाकळी शाखा अध्यक्ष गणेश कदम, अनिल नगरचे आनंद शिंदे,पांढरेवाडी येथील व्यापारी तालुका उपाध्यक्ष पांडुरंग सावंत, युवक तालुका अध्यक्ष अमर शिंदे, शाखाध्यक्ष अर्जुन भोईरकर, उपाध्यक्ष रोहन फाळके, खजिनदार विश्वजीत पवार, सचिव कृष्णदेव भूईरकर, सहसचिव ज्ञानेश्वर खपाले, कार्याध्यक्ष प्रदीप जगताप, नितीन फाळके, दिगंबर खपाले, रमेश चिखलकर, बालाजी भूईरकर, लक्ष्मण भोसले, करण भूईरकर, संदीप शिंदे, आनंद साळुंखे सह पांढरेवाडी गावातील लहान थोर सर्व नागरिक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यासाठी मानसिक तंदुरुस्ती महत्त्वाची : अलका काकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : कामाच्या ठिकाणी जर कर्मचाऱ्यांची मानसिक तंदुरुस्ती असेल तर त्यांची उत्पादकता व गुणवत्ता वाढू शकते. म्हणून त्यासाठी शारीरिक तंदुरुस्ती बरोबर कर्मचाऱ्यांने आणि व्यवस्थापनाने त्यांच्या मानसिक तंदुरुस्ती कडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन मानसतज्ञ व समुपदेशिका अलका काकडे यांनी केले.



जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

तर व्यासपिठावर एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या विश्वस्त प्रा. डॉ. नभा काकडे, मानसतज्ञ व समुपदेशिका मानसी काकडे - कुलकर्णी, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, फॅमिली प्लॅंनिंगच्या सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी मानसी काकडे - कुलकर्णी यांनी चेकलिस्टच्या आधारे उपस्थितांच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल महत्त्वाच्या बाबी सांगितल्या व कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य जपण्यासंबंधी मार्गदर्शन केले. अलका काकडे व मानसी काकडे - कुलकर्णी या दोन्ही समुपदेशकांनी सहभागी संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी व प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

या कार्यक्रमात सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती ट्रकर्स, मायग्रंट व सखी वन स्टॉप सेंटर, क्रांती महिला संघ, निरामय आरोग्यधाम, सारथी युथ फाऊंडेशन, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग विथ एच.आय.व्ही एड्स, शेळगी नागरी आरोग्य केंद्र, जोडभावी पेठ नागरी आरोग्य केंद्र, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा आदी सामाजिक संस्थांचे ५५ प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन.बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन भरत पाटोळे यांनी केले तर आभार प्रतिक्षा धोत्रे-बंदपट्टे यांनी मानले.

# लोकमंगल को-ऑप बँक सोलापूर व सिनाई परिवाराच्या संयुक्त विद्यमाने स्नेह-संवाद मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : लोकमंगल बँक व सिनाई परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने राजश्री लॉन्स मंगल कार्यालय कामती(बु) येथे बँकेचा अध्यक्ष या नात्याने स्नेह मेळाव्याला उपस्थित राहिलो. आण्णासाहेब पाटील व हिंदवी स्वराज्य संस्थापक श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचं पूजन करून बँकेमार्फत ग्राहकांना देण्यात आलेल्या नवीन वाहनाचे पूजन केले आणि त्यांना चावी प्रदान करण्यात आली.



बँकेमार्फत विविध शासकीय योजनेमधून देण्यात आलेल्या नवीन कर्जदारांचा प्रतिकात्मक चेक देऊन सन्मान करण्यात आला व बँकेच्या उत्कृष्ट ग्राहकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाची प्रस्तावना बँकेचे अधिकारी श्री.सुदन सुरवसे यांनी मांडली बँकेचे ग्राहक श्री.शहाजी देशमुख व श्री.तानाजी दळवे यांनी आपल्या मनोगतात बँकेचे आभार व्यक्त केले.

यावेळी आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सोलापूर जिल्हा समन्वयक श्री.योगेश वाघ यांनी महामंडळाच्या विविध योजनांची माहिती दिली त्यानंतर प्रमुख पाहुणे अॅड.श्री.बिरप्पा जाधव साहेब (चेअरमन जकराया शुगर) यांनी तरुणांनी व्यवसायात येताना काय करावं याविषयावर मार्गदर्शन केले. आयोजक श्री.अंकुश अवताडे यांनी मनोगत व्यक्त करताना बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत स्तुती केली. युवकांनी उद्योग व व्यवसायात उतरून रोजगार निर्मिती करावी आणि मोहोळ तालुका व्यवसाय व उद्योग यामध्ये जिल्ह्यात अग्रेसर राहील यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे आवाहन मी तरूणांना केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री.अजित कंदरे (उद्योगपती पंढरपूर), डॉ.बाळासाहेब सरवळे (उद्योजक), श्री राम काका जाधव (उ.सोलापूर तालुका अध्यक्ष भाजपा), श्री.प्रकाश नाना गायकवाड (संचालक,लोकमंगल पतसंस्था), ऋषिकेश जगताप (युवा सरपंच, सोहाळे), श्री.चंद्रकांत सरवळे (प्रगतशील बागायतदार)उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्री.सचिन मिसाळ यांनी तर आभार श्री.परमेश्वर जाधव यांनी केले.कार्यक्रमानंतर सिनाई परिवारातर्फे भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करणे हे फार्माकोव्हिजिलन्सचे प्राथमिक उद्दिष्ट**

**कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काबरा यांनी केले मार्गदर्शन**

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये 'फार्माकोव्हिजिलन्स आणि क्लिनिकल ट्रायल मधील संधी' वर एकदिवसीय व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बेंगलोर मधील 'नोवोटेक क्लिनिकल रिसर्च कंपनी'चे व्यवस्थापकीय संचालक संजय काबरा यांचे एक दिवसीय 'इंडस्ट्री एक्स्पर्ट लेक्चर' संपन्न झाले. करिअरच्या दृष्टीने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या 'फार्माकोव्हिजिलन्स आणि क्लिनिकल ट्रायल यांचे महत्व आणि गरज' या विषयावर हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काबरा यांना या क्षेत्रातील जवळपास २६ वर्षांचा अनुभव असून आशिया पॅसिफिक मधील जवळपास २२ देशांमध्ये क्लिनिकल रिसर्चच्या क्षेत्रात काम करणाऱ्या तसेच ट्रेनिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असणाऱ्या क्लिनिकल रिसर्च कामगारांना त्यांनी प्रशिक्षण दिले आहे. दीपप्रज्वलनानंतर डॉ. मणियार म्हणाले की, 'फार्माकोव्हिजिलन्स हे फार्मसी क्षेत्रातले माहिती आणि तंत्रज्ञान विभागातील महत्वाचे कार्यक्षेत्र आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना आपले करिअर करण्यासाठी उत्कृष्ट संधी असतात. तसेच औषधांच्या प्रतिकूल प्रतिक्रिया (एडीआर) आणि दुष्परिणामांचे निरीक्षण करून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करणे हे फार्माकोव्हिजिलन्सचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. 'फार्माकोव्हिजिलन्स' मुळे संभाव्य जोखमींचा लवकर शोध घेतल्याने आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रतिबंधात्मक कृती करण्याची परवानगी मिळते.






यामध्ये डोस समायोजित करणे किंवा बाजारातून हानिकारक औषधे काढून घेणे यांचा समावेश आहे. त्यामुळे या क्षेत्रात नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी करिअरसाठी उत्तम पर्याय म्हणून या क्षेत्राकडे पाहण्यास हरकत नाही. आज धकाधकीच्या जीवनात फार्मसीचे महत्व वाढत आहे. आय. टी. इंडस्ट्रीमध्ये सध्या असणाऱ्या मागणीमुळे विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये भारत आणि भारताबाहेर ही खूप संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे या विषयाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरेल.' फार्माकोव्हिजिलन्स सोबतच त्यांनी मेडिकल कोडींग, क्लीनिकल रिसर्च, रेगुलेटरी अफेअर्स, क्लिनिकल डेटा मॅनेजमेन्ट या विविध आय. टी. शी संबंधित असणाऱ्या कार्यक्षेत्राबद्दल माहिती सांगितली. या सर्व क्षेत्रांचा एकमेकांशी कसा संबंध आहे ? हे देखील त्यांनी सविस्तर सांगितले. आय. टी. कंपनीमध्ये कशा पद्धतीचे काम काज चालते, यासाठी कोणती साधने, कोणते सॉफ्टवेअर वापरले जातात, कंपनीमध्ये काम करताना कार्यप्रणाली कशा पद्धतीने असते, सध्या फार्मा आय. टी. इंडस्ट्री कंपन्यांची गरज आणि अभ्यासक्रमामध्ये आवश्यक गोष्टी यांबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. दुपारच्या सत्रामध्ये कंपन्यांमध्ये 'इंटरव्हिव्ह' कशा पद्धतीने असतात ह्यासाठी प्रत्यक्षरित्या मॉक इंटरव्यूव्ह घेतले. विद्यार्थ्यांकडून इंटरव्यूव्हमध्ये होत असणाऱ्या सामान्य चुका, त्या कशा टाळायच्या आणि कशा पद्धतीने उत्तम सादरीकरण होईल याकडे कसे लक्ष द्यायचे याबाबत छायाचित्रे व व्हिडिओ यांच्या माध्यमातून त्यांनी मार्गदर्शन केले. इंटरव्यूव्ह मध्ये काय केले पाहिजे आणि काय टाळले पाहिजे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. फ्रेशर विद्यार्थ्यांना विचारले जाणारे संभाव्य प्रश्न कोणते असतील तसेच त्यांची उत्तरे कशी द्यावीत, इंटव्युव्हसाठी जाताना पूर्व तयारी कशी करावी, अभ्यास कसा करावा याबद्दलची सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, 'मुलाखतींमध्ये आत्मविश्वास महत्त्वाची भूमिका बजावतो, मुलाखतकाराची उमेदवाराबद्दलची धारणा आणि उमेदवाराची एकूण कामगिरी या दोन्हींवर याचा परिणाम होतो. आत्मविश्वास मुलाखतीवर परिणाम करू शकतो. अशा काही प्रमुख गोष्टींमध्ये देहबोली, आवाज या महत्वाच्या बाबींवर विशेष लक्ष दिले पाहिजे' असे सांगून विविध क्षेत्रातील मुलाखतींवर काबरा यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी सुद्धा विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देत आपला सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांच्या करिअर विषयी असणाऱ्या प्रश्नांनाही मान्यवरांनी समाधानकारक उत्तरे दिली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप जाधव यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# दरेगाव येथे ढगफुटी सदृश पावसाने कपाशी पिकाचे अतोनात नुकसान

## आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी केली पाहणी; पंचनामे करण्याचे दिलें निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव परीसरात पावसाचे प्रमाण पाहता शेतकरी कापूस-सोयाबीन सारख्या पिकांवर अधिक भर देतात. तसेच नगदी पीक असल्याने अनेक जण या दोन्ही पिकांना पसंती देतात. मात्र यावेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे या दोन्ही पिकांना मोठ्याप्रमाणात फटका बसला आहे. सोयाबीन काढणीला आले होते तर कापसाची वेचणी सुरू होण्याअगोदर अधिकचा पाऊस झाला. त्यामुळे हातात आलेलं पीक शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर होत्याच नव्हतं झालं.

**नऊ ते तेरा आक्टोंबर रोजी सायंकाळी अचानक पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या कपाशी पिकाचे मोठे नुकसान झाले असता. आ.डाँ.राजेंद्र शिंगणे यांनी पाहणी केली असता.महसुल विभागाला पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले होते.परंतु अहवाल पाठवुन ही महसूल विभागाने अद्याप प्रर्यंत पंचनामे करण्याचा आदेश दिला नसुन.त्वरीत पंचनामे करून आचारसंहितेच्या आगोदर मदत जाहीर करवी**

**– सुनील काळुसे** (शेतकरी) अध्यक्ष सिंदखेडराजा तालुका भा ज पा किसान मोर्चा

याचप्रमाणे दरेगाव येथिल शेतकरी कपाशी व अनेक नामांकित कंपन्यांच्या काँटन सिडस लावुन अधिक कापूस उत्पन्न घेतात या साठी . लागणारा खर्च फवारणी खत खुरपणी हे सगळे मिळून त्यांना जवळपास ३५ ते ४० हजार रुपये दोन ते तीन एकर जमीन असणारा शेतकरी खर्च लावतो. तर एवढं सगळं करुन हातात जास्त कापूस येईल अशी अपेक्षा त्यांना होती. मात्र सातत्याने पावसाळ्यात पाऊस सुरू असल्याने आणि त्यात आता परतीच्या पावसाने त्यांचे स्वप्न उध्वस्त केले आहे.तसेच अशीच पावसाची ढगफुटी सारखी परिस्थिती राहिली तर शेतकऱ्यांच्या हाती शिल्लकही कापूस .व सोयाबीन चे उत्पन्न हाती येणार नसल्याचं शेतकरी. वर्गांची चर्चा दिसुन येत आहे.त्यामुळे लावलेला खर्चही त्यांच्या हातात पडणार नाही आणि नेहमीप्रमाणे तोट्यातील शेती त्यांना यावेळीही करावी लागल्याची खंत शेतकरी करत आहे.दरेगाव शिवारात ढगफुटी झाल्याने सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी पाहणी केली असता . शेतकऱ्यांच्या कपाशी पिकाचे नुकसान झाल्याने तातडीने महसूल विभाग यांना पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. तलाठी.व मंडळ अधिकारी यांनी तहसीलदार यांना तसा अहवाल सादर केला आहे.

उपस्थित तहसीलदार. मंडळ अधिकारी आनंद राजपूत.तलाठी .डि एच दांडगे. माजी जि प सदस्य.अरून वाघ. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष. गजानन वायाळ.दरेगाव तंटामुक्ती अध्यक्ष.बबनराव जायभाये.सरपंच पती.रवि मांटे.व शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते.



**दरेगाव येथे ढगफुटी सदृश झाल्याने पाहणी केली असता शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने व वाकल्यामुळे कपाशी पिके धोक्यात आल्याचे दिसून आले असता तसा अहवाल तहसीलदार साहेब याना पाठविला आहे.**

**– डि एच दांडगे (तलाठी)**

## थोडक्यात...



### युवा मित्र संस्था यांच्या वतीने डुबेरे विद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर

सिन्नर/प्रतिनिधी : युवा मित्र संस्था वतीने आयुष्यमान आधार एकात्मिक मासिक पाळी संदर्भात विद्यालयातील किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता व काळजी तसेच या काळात घ्यावयाचा सकस आहार या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यालयातील इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या सर्व मुलींची वजन उंचीसह आरोग्य तपासणी करण्यात आली . मासिक पाळीच्या काळातील आजार तसेच विविध आजारावर मुलींना गोळ्यांचे वाटप करण्यात आले. युवा मित्राच्या संचालिका मनीषा मालपाठक- पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी प्रास्ताविक करून युवा मित्राच्या संचालिका मनीषा पोटे तसेच उपस्थित डॉक्टर व सेवकांचा सत्कार व स्वागत केले. सूत्रसंचालन पी. आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले. डुबेरे आरोग्य उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सोनाली केंद्रे, पाटोळे येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वंदना खेडेकर यांनी विद्यार्थिनींची तपासणी केली. त्यांना आशा स्वयंसेविका परवीन शेख , उषा वाजे ,अर्चना वाघ ,युवा मित्र संस्थेच्या स्वाती गोळेसर, पूजा गरसुळे ,योगिता गोळेसर व कल्पना डावरे यांनी सहकार्य केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने इंदापूर तालुक्यातील ‘जंक्शन’ ‘एमआयडीसी’चा प्रश्न मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील प्रस्तावित जंक्शन ‘एमआयडीसी’साठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील १३१ हेक्टर ५० आर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला हस्तांतरण करण्याचा महत्वपूर्ण निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने जंक्शन ‘एमआयडीसी’चा प्रश्न मार्गी लागला असून इंदापूरकरांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या निर्णयाबद्दल इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांच्यासह इंदापूर तालुक्यातील जनतेने उपुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी,

**आमदार दत्तात्रय भरणेंसह इंदापूरकारांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार**

इंदापूर तालुक्यातील तरुणांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जंक्शन येथील एमआयडीसी प्रस्तावित करण्यात आली होती. या एमआयडीसीसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील मौजे जंक्शन येथील २० हेक्टर ३८ आर., मौजे भरणेवाडी येथील २४ हेक्टर २४ आर., मौजे अंथुर्णे येथील २१ हेक्टर १८ आर., मौजे लासुर्णे येथील ६५ हेक्टर ७० आर. अशी एकूण १३१ हेक्टर ५० आर एवढे क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला हस्तांतरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक उद्योग इंदापूर तालुक्यात येणार आहेत. तसेच तालुक्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. इंदापूर तालुक्यांतील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ही एमआयडीसी उपयुक्त ठरणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेऊन इंदापूर तालुक्याचा हा प्रश्न मार्गी लावला आहे, त्यामुळे इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांच्यासह इंदापूरकरांनी उपुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.



# एमपीसीबीने भिवंडीतील अनाधिकृत केमिकल गोदामांवर कारवाई करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील अनाधिकृत आणि बेकादेशीर असणाऱ्या केमिकल गोडाऊन विरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या आवर सचिव अर्चना परशुरामे यांनी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे यांना दिले आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की भिवंडी तालुक्यातील मौजे गुंदवली, वळ, दापोडे, पूर्णा, राहनाल, कोपर, काल्हेर, कशेळी, मानकोली, ओवळी, पिंपळास, देवरुंग, बापगाव, कोन, आमने, कुरुंद या व इतर गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अनाधिकृत केमिकल गोडाऊनस आहेत.

या गोडाउन्सला प्रचंड प्रमाणात आगी लागण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. केमिकल्स गोडाऊन मुळे भोपाळ मध्ये झालेल्या युनियन कार्बाइड या केमिकल कंपनीमध्ये झालेल्या वायुगळतीत लाखो लोकांना त्रास सहन करावा लागला होता. त्याची पुनरावृत्ती भिवंडीतील या केमिकल्स गोडाऊन्समुळे होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या गोडाउन्स विरुद्ध कारवाई करण्यासाठी राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद काशिनाथ धुमाळ यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार निवेदन सादर केले होते. सदर तक्रार निवेदन देवेंद्र फडणवीस यांनी पर्यावरण विभागाकडे पाठवून उचित कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पर्यावरण विभागाच्या अवरसचिव अर्चना परशुरामे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे शासकीय सदस्य सचिव अविनाश ढाकणे यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले असून केमिकल्स गोडाऊन विरुद्ध अविनाश ढाकणे हे कोणती कारवाई करतात याकडे निवेदनकार शरद धुमाळ यांचे लक्ष लागले आहे.

# कोष्टी समाज बांधवाकडून शिवानंद घोळसगांव यांचा भव्य नागरी सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : देवरदासमय्या हटगार कोष्टी समाज वागदरी व लिंगायत हटगार कोष्टी समाज संस्था, महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने मौजे वागदरी ता.अक्कलकोट जिल्हा सोलापूर येथील नवनिर्वाचित सरपंच शिवानंद परमेश्वर घोळसगाव व तसेच उपसरपंच पंकज सुतार या उभयंताचा राज्याचे अध्यक्ष डॉ.नंदकुमार वसवाडे सर यांच्या शुभहस्ते , सौ.सुनंदा अष्टगी मॅडम,श्री परमेश्वर जावळकोटी सर, श्री.अनिल तुळसणकर सर,ड. किरण कोष्टी सर,श्री सचिन हळदे सर, श्री योगेश हळाळे सर, श्री ईश्वरआप्पा झुंजा सर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित सरपंच व उपसरपंच यांचा सपत्नीक भव्य नागरी सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी राजकुमार निरोळी होते.ज्येष्ठ समाज बांधव सिध्दाराम बटगेरी ,माणिक निलगार,मल्लप्पा मामा निरोळी, शिवशरण वमने ,रवि घोळसगांव, शिवशंकर बाबा,बसवंतराव वळसंग इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.राजू नडगेरी सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अक्कलकोट तालुका अध्यक्ष शिवानंद चितली तसेच वागदरी अध्यक्ष शिवानंद ढवणे,प्रकाश मुनोळी ,परमेश्वर ममदापुरे व त्यांच्या टीमने प्रचंड मेहनत घेतली. याप्रसंगी सोसायटी संचालक, ग्रामपंचायत सदस्य,वागदरी ,सलगर, तोळणूर , येथील समाज बंधू भगिनी, मित्रमंडळी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्रसंचलन चंद्रकांत बटगेरी सर तर आभार नागप्पा अष्टगी सर यांनी मानले.

# वंचित बहुजन आघाडीचे इंदापूर तालुका अध्यक्ष संतोष मिसाळ यांनी घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे : वंचित बहुजन आघाडीचे इंदापूर तालुका अध्यक्ष संतोष मिसाळ यांनी घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या सोबत पुणे जिल्हा पूर्व मधील इंदापूर, बारामती, दौंड, शिरूर, खेड, आंबेगाव, जुन्नर विधानसभेच्या उमेदवारांसंदर्भात चर्चा झाली यामध्ये पुणे जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये आपण सक्षम उमेदवार देणार असून त्यातील काही उमेदवार फायनल झालेले असून त्यांची नावे लवकरच प्रसिद्ध होतील त्यामुळे साहेबांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना विधानसभेच्या पुढील तयारी लागा असे आवाहन केले. यावेळी वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा अध्यक्ष राजकुमार साहेब, महासचिव सतीश साळवे, उपाध्यक्ष रणजीत पाडळे, सचिव गोविंद कांबळे, इंदापूर तालुका अध्यक्ष संतोष मिसाळ उपस्थित होते



# जनसेवा हीच ईश्वर सेवा समजून वृद्धाश्रमास ॲम्बुलन्स भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/ संजय चव्हाण : जनसेवा हीच ईश्वर सेवा असे समजून श्रावणबाळ वृद्धाश्रम अकिवाट तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर येथे गेली पाच वर्षे अति कष्टाने गोरगरीब निराधार वंचित नागरिकांना या आश्रम मध्ये मानाचे स्थान आहे या नागरिकांना आरोग्याची कोणतीही अडचण येऊ नये यासाठी श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चे चेअरमन व कार्यकारी संचालक आमचे आधारस्तंभ माननीय माधवराव जी घाटगेदादा यांनी एक सामाजिक कार्य म्हणून श्रावण बाळ वृद्धाश्रम येथे म्बुलन्स ची फार आवश्यकता होती म्हणून माननीय राज्याचे वैद्यकीय व उंचतंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या प्रयत्नातून सुरेश सासणे संचलित श्रावण बाळ वृद्धाश्रम यांना साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्तअसलेला दसऱ्या दिवशी गुरुदत्त साखर कारखान्या च्या आवारात भव्य असा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमांमध्ये रुग्णवाहिका प्रदान करण्यात आलीयावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय भावी आमदार अशोक रावजी माने हे होते याप्रसंगी कुरुंदवाड नगरीचे माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे तात्या, माननीय राजवर्धन नाईक, निंबाळकर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्राचार्य चंद्रकांत मोरे गुरुदत्त शुगरचे संचालक शिवाजी माने देशमुख भारतीय जनता पार्टी शिरोळतालुका अध्यक्ष माननीय मुकुंद गावडे, आंदोलन सम्राट विश्वासराव बाली घाटे, डॉक्टर संदीप नागणे विजय मगदूम, अरुण ऐनापुरे, शाबुद्दीन टाकवडे सर, शेती अधिकारी ओम प्रकाश तांबोळे, शशिकांत चौधरी शिरढोणचे तंटामुक्त अध्यक्ष प्रमोद कांबळे संजय दनाने बाहुबली मालगाव स्वप्निल सासणे विलास सासणे चंद्रकांत सासणे महावीर मगदूम रावसाहेब बिरोजे मल्लाप्पा कोरे शिवाजी कोळी व सर्वधर्मसमभाव नवरात्र उत्सवाचे संपूर्ण कार्यकर्ते उपस्थित होते हा कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.



## नळदुर्ग शहरात सिमोलंघन मोठ्या उत्साहात साजरा

## शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने भगव्या टोप्यांचे वाटप

# आई राजा उदो, उदो गजर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने शहर दुमदुमले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : विजया दशमीनिमित्त आई राजा उदो, उदोच्या प्रचंड जयघोषात निघालेल्या अंबाबाईच्या पालखी मिरवणुकीनंतर नळदुर्ग येथे नवरात्र महोत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली .यावेळी पालखी मिरवणुक सोहळ्यात हजारोंच्या संख्येने हिंदु बांधव सहभागी झाले होते यामध्ये महिलांची संख्याही मोठी होती.

विजया दशमीनिमित्त नळदुर्ग शहरात सायंकाळी सहा वाजता अंबाबाईची पालखितुन भव्य मिरवणुक काढण्यात आली. अंबाबाई मंदिर ते बसस्थानकच्या पाठीमागे असणाऱ्या पारंपारीक सिमोल्लंघन मैदाना पर्यंत ही पालखी मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत आमदार राणा जगजितसिंह पाटील हे कांही काळ सहभागी होऊन पालखीला खांदा दिला होता त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे यानी ही मिरवणुकीत सहभागी झाले होते. आई राजा उदो, उदोचा खुप मोठा गजर झाला आसुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषात निघालेल्या या भव्य पालखी मिरवणुकीत हिंदु बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. नागरीक व युवकांनी डोक्यावर भगवी टोपी परीधान केल्याने शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण निर्माण झाले होते. वाजत-गाजत निघालेल्या या पालखी मिरवणुकीचे प्रत्येक चौकात नागरीकांनी स्वागत करून आई अंबाबाईचे दर्शन घेतले. मिरवणुकीत सहभागी झालेल्या आराधी महिला हलगीच्या तालावर हातात पोत घेऊन अंगात येऊन नाचत होत्या. अंबाबाई देवस्थान ट्रस्ट व नगरपालिकेने मिरवणुक मार्गावर स्वच्छता तसेच विजेची सोय चांगल्या प्रकारे केली होती त्याचबरोबर यावेळी मोठ्या प्रमाणात शोभेची दारू उडविण्यात आली.



मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व हिंदु बांधवाना नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने भगव्या टोप्यांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अनेक ठिकाणी मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरीकांना पिण्याचे पाणी व दुध तसेच ज्युसचे वाटप करण्यात आले. मिरवणुक सिमोलंघन मैदानात आल्यानंतर त्याठिकाणी सोने चांदी लुटण्याचा कार्यक्रम पार पडला. सिमोलंघन झाल्या नंतर पालखी पुन्हा मंदिराकडे आणल्यानंतर पालखी मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले यावेळी नळदुर्ग ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे व पोलीस उपनिरीक्षक इश्वर नागंरे सह पोलीसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता .